# अ‍ॅग्रोव्हिजन कृषी प्रदर्शन नोव्हेंबरमध्ये

उपराजधानी नगरी / प्रतिनिधी

**नागपूर : विदर्भातील कृषी परिवर्तनाचे माध्यम व शेतकऱ्यांच्या प्रगतीचा महामार्ग ठरत असलेले मध्य भारतातील सर्वांत मोठे कृषी प्रदर्शन येत्या २३ ते २६ नोव्हेंबरदरम्यान रेशीमबाग मैदानावर आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या उद्घाटनाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावे, अशी विनंती करण्यात आली असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.**



## उद्घाटनासाठी पंतप्रधानांना दिले निमंत्रण

## शेतकऱ्यांना मिळणार प्रगतीचे धडे

अ‍ॅग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाच्या तयारीसाठी विदर्भातील प्रतिनिधींची बैठक शनिवारी हॉटेल अशोका येथे आयोजित करण्यात आली होती. यानंतर आयोजित पत्रकारपरिषदेत बोलताना गडकरी म्हणाले, अ‍ॅग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाचे यंदाचे हे दहावे वर्ष आहे. २३ नोव्हेंबर रोजी उद्घाटन सोहळा होईल. विदर्भातील शेतकऱ्यांना शिक्षित, प्रोत्साहित करण्यासह सबल करण्याच्या उद्देशाने गेल्या नऊ वर्षांपासून अ‍ॅग्रोव्हिजनचे आयोजन करण्यात येत आहे. कृषिज्ञान, तंत्रज्ञान प्रशिक्षणाचे केंद्रस्थान ठरणाऱ्या कार्यशाळा, अत्याधुनिक सादरीकरणाची दालने, कृषीविषयक विषयांवरील चर्चासत्रे, विदर्भाच्या शेतीला नवी दिशा देणाऱ्या परिषदांसोबतच भव्य पशुप्रदर्शन, अ‍ॅग्रिथॉन आणि बळीराजाच्या गौरवाचा अ‍ॅग्रोव्हिजन अवॉर्ड सोहळा ही यंदाच्या प्रदर्शनाची वैशिष्ट्ये राहणार आहे. अ‍ॅग्रोव्हिजनमध्ये गेल्या वर्षी प्रथमच पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. त्या पार्श्वभूमीवर यंदाही महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, महाराष्ट्र पशुसंवर्धन विभागाच्या सहकार्याने पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. विदर्भातील शेतीक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात येईल, असेही गडकरी यांनी सांगितले. यावेळी खासदार कृपाल तुमाने, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा निशा सावरकर, आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी, माजी आ. आशिष जयस्वाल, रवी बोरटकर, कृषितज्ज्ञ डॉ. सी. डी. मायी, अशोक मानकर, रमेश मानकर आदी उपस्थित होते.

» अ‍ॅग्रोव्हिजनचे प्रमुख आकर्षण असणाऱ्या कार्यशाळांमध्ये उत्पादन, तंत्रज्ञान, शेतीपद्धती, जोडधंदे, अत्याधुनिक तंत्रज्ञान, बाजार सुविधा, पायाभूत सुविधांवर भर देण्यात येणार आहे. प्रत्येकी दीड तासाच्या पंधराहून अधिक विषयांवर कार्यशाळा होतील. देशभरातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि विदर्भातील यशस्वी शेतकऱ्यांच्या यशोगाथांपासून प्रेरणा घेण्याची संधी यातून शेतकऱ्यांना मिळेल.

» विदर्भासाठी तसेच कोरडवाहू शेतीसाठी उपयुक्त अशा पाच विषयांवर प्रत्येकी तीन तासांच्या सखोल मार्गदर्शनपर कार्यशाळाही प्रदर्शनाच्या कालावधित घेण्यात येतील. यात दुग्धव्यवसाय, फूलशेती, हळद व आले लागवड, संत्राप्रक्रिया, सेंद्रिय शेती, मत्स्यपालन आणि कुक्कुटपालन या विषयांचा समावेश आहे.